जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७२ दिनांक - २९/०१/२०२५**

गुन्हे शाखा, युनिट-४, पुणे शहर.

## मोक्का गुन्हयात पाच महीन्यापासुन फरारी असलेल्या ०३ आरोपीच्या गुन्हे शाखा, युनिट-०४ ने आवळल्या मुसक्या

मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. राजेंद्र मुळीक, यांचे सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, युनिट-४ गुन्हे शाखा पुणे शहर यांनी युनिट-४ चे हद्दीमध्ये गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करुन रेकॉर्ड वरिल आरोपी चेक करणे तसेच गंभीर गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणणे, पाहीजे फरारी आरोपी, मोक्कयातील आरोपींचा शोध घेवुन मिळुन आल्यास कारवाई करणेबाबत आदेश दिले.

दि.२८/०१/२०२५ रोजी गुन्हे शाखा, युनिट-०४ चे पथक चतुःश्रृंगी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना **पोलीस अंमलदार जहांगीर पठाण, व विशाल गाडे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मोक्का गुन्ह्यातील पाहीजे आरोपी नामे किरण खुडे, दिपक डोके व अमन डोके हे इऑन आयटी पार्क समोरील गिल्ट हॉटेलमध्ये आहेत. अशी बातमी मिळाल्याने सदर पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे यांना माहीती दिली असता त्यांनी बातमीप्रमाणे खात्री करुन कारवाई करणेचे आदेश दिले.

गुन्हे शाखा, युनिट -०४ चे पथकाने बातमीच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता बातमीतील वर्णनाचे इसम हे हॉटेल गिल्ट खराडी पुणे येथे मिळुन आल्याने सदर इसमांना ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्याची नावे **१) अमन राजेंद्र डोके वय १९ वर्षे, रा. राजीव गांधीनगर, खडकी, पुणे, २) दिपक राजेंद्र डोके वय २३ वर्षे, रा. राजीव गांधीनगर, खडकी, पुणे, ३) किरण अनिल खुडे वय २३ वर्षे, रा. राजीव गांधीनगर, खडकी, पुणे** असे असल्याचे सांगितले.

त्यांचेकडे प्राथमिक तपास करता, त्यांनी खडकी पोलीस स्टेशन गु. रजि. नं. २५२/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९०, ११०, ३२४ (४)(५), ३३३, ३०५ (ए), ३१०, ३११ सह आर्म ॲक्ट ४(२५) महाराष्ट्र पोलीस अधि. ३७(१) सह १३५ क्रिमिनल लॉ अमेंडमेंड २०१३ चे कलम ७ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) प्रमाणे त्याचे साथीदारांसह केला असल्याची कबूली दिली आहे. त्यांना पुढील कायदेशीर कारवाई करीता मा.सहा. पोलीस आयुक्त खडकी विभाग पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे, युनिट-४ यांचे मार्गदर्शनात युनिट ४ कडील पोलीस उप निरीक्षक, वैभव मगदुम, पोलीस अंमलदार जहांगिर पठाण, विशाल गाडे, विठ्ठल वाव्हळ, प्रविण भालचीम, विनोद महाजन, सुभाष आव्हाड, चालक सहा.पो. फौ. शितल शिंदे यांनी केली आहे.

